# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ Dindori Road,Mhasrul,Nashik-422004

Tel:(0253)2539161/6659161,Student Helpline:(0253) 2539111/6659111

Website : www.muhs.ac.in, E-mail : establishment@muhs.ac.in

**डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ**
एम.बी.बी.एस.,एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),डी.एन.बी.,एल.एल.बी.
**कुलसचिव**

**Dr.Rajendra Shivaji Bangal**
M.B.B.S.,M.D.(Forensic Medicine),D.N.B.,LL.B
**Registrar**


जा.क्र. मआविवि/आस्था/१९८/२०२३

दि.१९/०४/२०२३

## नियुक्ती आदेश

प्रति,

**श्री. अजित अनिल डेरे**
मु. पो. माल्लुंजे खु.
ता. राहुरी
जि. अहमदनगर – ४१३ ७२१

संदर्भ : विद्यापीठ जाहिरात क्र. ०९/२०२२ दि. २५/०७/२०२२

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या आस्थापनेद्वारे शासन मंजुर रिक्त पदांची दि. २५/०७/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरात क्र. ०९/२०२२ नुसार आपण केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने आपणास गट -क (वर्ग-३) संवर्गात "सांख्यिकी सहायक" या पदातील **अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातून "सांख्यिकी सहायक"** या पदावर सुधारित वेतन मॅट्रिक्स मधील वेतनस्तर S-14: 38600-122800 या वेतनसंरचनेत खालील अटी व शर्तींचे अधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

१) आपणांस गट -क या सवंर्गात नामनिर्देशनाने **"सांख्यिकी सहायक"** पदावर परिविक्षाधीन उमेदवार म्हणून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे.

२) आपली नियुक्ती रुजू दिनांकापासून २ वर्षे पर्यंत परिविक्षाधीन राहील. परिविक्षाधीन कालावधीमध्ये आपली सेवा समाधानकारक नसल्यास सदर कालावधी जास्तीतजास्त एक वर्षापर्यंत वाढविण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना असेल.

३) परिविक्षाधीन कालावधीमध्ये एक महिन्यांची पूर्वसूचना किंवा एक महिन्याचे मुळ वेतन देवून आपणास सेवेतून मुक्त होता येईल. एक वर्ष वाढीव परिविक्षाधीन कालावधीत देखील आपली सेवा समाधानकारक नसल्यास आपली सेवा कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्यात येईल.

४) एक वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीत आपले काम व वर्तणूक समाधानकारक असल्याचा अहवाल आपल्या नियंत्रण अधिकाऱ्याकडून प्राप्त झाल्यानंतर आपण पहिली वार्षिक वेतनवाढ मिळण्यास पात्र असाल. तदनंतरची दुसरी वेतनवाढ ही आपण परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतरच देण्यात येईल. सदर कालावधीमध्ये आपल्या वर्तणूकीत काही गैरप्रकार आढळल्यास आपल्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) वर्तणूक नियम १९७९ नुसार कारवाई करण्यात येईल.

५) आपला परिविक्षाधीन कालावधी/ वाढीव परिविक्षाधीन कालावधी संपल्यानंतर आपल्या सेवा समाधानकारक असतील तर, आपल्या सेवा कायम करण्यात येतील.

६) आपली सेवा महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ अधिनियम १९९८ मधील अटी व तरतुदी, विद्यापीठाच्या यथोचित प्राधिकारी/प्राधिकरणाचे निर्णय तथा विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेले परिनियम, अध्यादेश, नियम व विनियम तसेच निदेश यामधील अटी व तरतुदी तथा महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील लागू असलेल्या तरतुदी, तसेच शासनाने शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वेळोवेळी लागू केलेल्या सेवेच्या अटी व शर्तीनुसार प्रतिबंधित राहील.

७) नियमाप्रमाणे सध्या अनुज्ञेय असलेले तसेच, वेळोवेळी देय होणारे सुधारित भत्ते मिळण्यास आपण यथोचित नियमांच्या अधीन राहून पात्र असाल.

८) आपणास ही नियुक्ती स्विकारावयाची असल्यास व आपण जर शासकीय/निमशासकीय सेवेत असाल तर रुजू होते वेळी आपल्या मुळ नियुक्तीकर्त्याच्या कार्यालयाकडून सेवेतून मुक्त केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. तसेच, शासनाच्या नियमाप्रमाणे विहित नमुन्यातील वचनपत्र भरुन द्यावे लागेल.

९) सदर पदावर रुजू झालेचे दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जिल्हा शल्यचिकीत्सक, नाशिक यांचेकडील शारिरीकदृष्टया पात्रतेसंबंधीचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१०) शासनाने विहित केलेल्या उच्चत्तम हिंदी व मराठी परीक्षा शासनाने विहित केलेल्या कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

११) आपणांस नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून तपासणी करुन घेण्याच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येऊन सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

१२) परिविक्षाधीन कालावधी समाप्त होण्यापूर्वी आपण संगणक प्रशिक्षण परीक्षा MS-CIT किंवा शासनाने शासन निर्णयान्वये विहित केलेली समकक्ष परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असेल.

१३) सदर पदावर रुजू झालेचे दिनांकापासून ३ महिन्याचे आत आपण महाराष्ट्र नागरी सेवा नियम (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम १९ आणि शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग सीआर १०७९/२०५९/२३३/११ दिनांक २०/११/१९८० अनुसार विहित केलेले मत्ता व दायीत्व (Assets and liabilities) या बाबतचे विवरण पत्र भरुन या कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक असेल.

१४) विद्यापीठाच्या प्रशासकीय सौकार्याच्यादृष्टीने विद्यापीठाचे विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर, लातूर येथे किंवा भविष्यात स्थापित केल्या जाणारे विभाग/ विभागीय केंद्राचे ठिकाणी बदली करण्यात आल्यास त्याप्रमाणे बदलीच्या ठिकाणी रुजू होणे / कामकाज करणे बंधनकारक असेल.

१५) आपल्या सेवा नियुक्ती प्राधिकारी यांचे प्रशासकीय नियंत्रणाखाली असतील. नियुक्ती प्राधिकारी यांनी दिलेल्या सुचना / निदेशानुसार आपले कर्तव्य पार पाडणे बंधनकारक राहील. तसेच कर्तव्याचे पालन न केल्यास आपली अस्थायी नियुक्ती कोणत्याही स्तरावर संपुष्टात आणण्यात येईल/ आपल्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) वर्तणुक नियम १९७९ नुसार कारवाई करण्यात येईल.

१६) आपणास नेमणूक /नोकरी सोडावयाची झाल्यास किमान एक महिना तशी आगाऊ सूचना देऊन राजीनामा मंजूर करुन घ्यावा. तशी आगाऊ सूचना न दिल्यास १ महिन्याचे मूळ वेतन वसूल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील.

**१७) या आदेशाचे दिनांकापासून नेमणूकीचे पदावर दिनांक १८/०५/२०२३ पावेतो कार्यालयीन वेळेत तात्काळ रुजू होणे आवश्यक असेल. अन्यथा आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.**

**१८) नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सदर पदावर आपण नेमणूक स्वीकारण्यास इच्छुक आहात किंवा नाही याबाबत विद्यापीठास आपले लेखी सहमती पत्र निम्नस्वाक्षरीताच्या नावे recruitment@muhs.ac.in या ईमेलवर सात दिवसात सादर करणे आवश्यक आहे.**

१९) आपली नियुक्ती पूर्व चारित्र्य व वर्तणूक (पोलीस चौकशी) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील व तसा तपासणी अहवाल आक्षेपार्ह असल्यास आपली नियुक्ती कोणतीही पूर्व सूचना न देता तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल. तसेच, आपल्याविरुध्द कोणत्याही पोलीस स्टेशन मध्ये कोणत्याही प्रकारचा गुन्हा नोंद नाही याबाबतीत रुजू होतांना विहीत नमुन्यातील नोटरी केलेले प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

२०) नव्याने नियुक्त होणाऱ्या उमेदवारास शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक/अनियो -१००५/१२६/सेवा-४ ३१/१०/२००५ नुसार व शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अनियो १००७/१८/सेवा-४, दि.०७/०७/२००७ व शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अनियो-२०१२/प्र.क्र. ९६/सेवा -४, दि. २७/०८/२०१४ व वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र. मआवि-२०१२/प्र.क्र.७३८/भाग २ /१२/शिक्षण -१ दिनांक ३१ जूलै २०१८ नुसार लागू करण्यात आलेली "नवीन परिभाषित अशंदान निवृत्तीवेतन योजना" (New Defined Contributory Pension Scheme)/ राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (National Pension Scheme) लागू राहील. आपणास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहणार नाही.

२१) आपली नियुक्ती जाहिरातीत संबंधित पदास नमूद केलेली आवश्यक अर्हता इ. बाबत आपण सादर केलेले अनुभव प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र इ.ची पडताळणी संबंधित कार्यालय/ विभागाकडून प्राप्त होणाऱ्या अहवालावर अधीन राहील. सदर प्रमाणपत्र आक्षेपार्ह तसेच बनावट आढळल्यास आपली नियुक्ती कोणतीही पूर्व सूचना न देता तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

२२) मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र. ८२३४/२०१९ (महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ कर्मचारी संघटना विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर) यामध्ये होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहून उक्त नियुक्ती आदेश देण्यात येत असून, सदर याचिकेतील मा. न्यायालयाचा अंतिम निर्णय आपणांस बंधनकारक असेल.

**(डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ)**
**कुलसचिव**

प्रत : १) कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
२) प्रतिकुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
३) कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक
४) वित्त व लेखा अधिकारी, मआविवि, नाशिक
४) वैयक्तिक नस्ती, आस्थापना विभाग, मआविवि, नाशिक